I/552530/20:

महाराष्ट्र शासन

फोन नं.०२२ ६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.idteromumbai.org.in

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, बांद्रे(पूर्व), मुंबई ५१.

क्र. २/विकामुं/तंशि/आस्था-२/२०२४/ दिनांक :

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय
अनुदानित पदविका संस्था,

विषय – शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील अध्यापकांना ५ व्या वेतन आयोगात करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत दि.०१/०१/१९९६ रोजी पासून निवडश्रेणी मंजूर केलेल्या व रु. १२०००-४२०-१८३००/- या वेतनश्रेणीत वेतन आहरीत करीत असलेल्याअध्यापकांना ५ वर्ष पूर्ण झाल्यावर दि.०१/०१/२००१ रोजी रु. १४९४०/- इतके वेतन उंचानून देणेबाबत.

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.५/तंशिसं/वेतनश्रेणी/१४९४०/२०२४/२२१, दि.२/८/२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पाचव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेस अनुसरुन शासनाने तंत्रशिक्षण विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदविका संस्थेतील अध्यापकांना संदर्भीय शासन निर्णयान्वये पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारीत वेतनश्रेणी लागू केलेली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.०७/०२/२००३ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१९ मध्ये शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत निवडश्रेणीच्या अनुषंगाने वेतननिश्चिती करणेबाबत नमूद केलेले आहे. सदर मुद्द्यात पदविका संस्थेतील अध्यापकांना असुधारीत वेतनश्रेणी रु. ३७००-१२५-४९००-१५०-५७००/- या वेतनश्रेणीत किंवा करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत दि.०१/०१/१९९६ रोजी पासून निवडश्रेणी रु. १२०००-४२०-१८३००/- ही वेतनश्रेणीत मंजूर करण्यात आलेली आहे. अशा अध्यापकांना ५ वर्षाची सेवा पूर्ण केल्यावर दि.०१/०१/२००१ रोजी रु. १२०००-४२०-१८३००/- या वेतनश्रेणीत किमान वेन रु. १४९४०/- इतके वेतन उंचावून देणेबाबतची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पात्र अध्यापकांना उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार दि.०१/०१/२००१ रोजी किमान रु. १४९४०/- इतके वेतन उंचावून देणेबाबत उचित कार्यवाही आपल्या संस्थेकडून करण्यात आलेली असल्याची खातरजमा करण्यात यावी. आपल्या संस्थेतील पात्र अध्यापकांना दि.०१/०१/२००१ रोजी किमान रु. १४९४०/- इतके वेतन उंचावुन देण्यात आलेले नसल्यास अशा अध्यापकांची उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पात्र अध्यापकांना रु. १४९४०/- वेतन उंचावुन देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करणेबाबत संचालनालयाने संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

सदर प्रकरणी आपल्या संस्थेतील पात्र अध्यापकांना दि.०१/०१/२००१ रोजी किमान रु. १४९४०/- इतके वेतन उंचावुन देण्यास दिरंगाई किंवा विलंब झाल्यास व त्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास होणाऱ्या परिणामास संबंधीत संस्थाप्रमुख म्हणुन आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

Signed by
Pramod A Naik
Date: 28-08-2024 16:29

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

https://mahaeoffice.maharashtra.gov.in/efile/#/dispatchDiary/intra?params=W3sib2Zmc2V0IjowLCJsaW1pdCI6MjAsIm9yZGVyQnkiOiJkYXRlIiwiZ...
1/1

Shri Vile Parle Kelavani Mandal`s
SHRI BHAGUBHAI MAFATLAL POLYTECHNIC
AND COLLEGE OF ENGINEERING
(DTE CODE : 3025)
Approved by AICTE,DTE, (M.S.)
Grant - in - aid, Autonomous Diploma Institute, NBA Accredited Diploma Programmes
UG Degree Programmes Affiliate to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

एन-५/ ५५९/२०२४-२०२५ दि. ३०.०८.२०२४

# परिपत्रक

**शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील अध्यापकांना ५ व्या वेतन आयोगात करिअर अडॅव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत दि. ०१/०१/१९९६ रोजी पासून निवडश्रेणी मंजूर केलेल्या व रु. १२०००-४२०-१८३००/- या वेतनश्रेणीत वेतन आहरीत करीत असलेल्या अध्यापकांना ५ वर्ष पूर्ण झाल्यावर दि. ०१/०१/२००१ रोजी रु. १४,९४०/- इतके वेतन उंचावून देणेबाबत.**

मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-JDRO01(11)/10/2024-JTDIRROMUM, दि. २८/०८/२०२४ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासकीय व अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदविका संस्थेतील अध्यापकांना दि. ०७/०२/२००३ च्या शासन निर्णयान्वये पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारीत वेतनश्रेणी लागू केलेली आहे (सदर पत्राची प्रत सोबत जोडत आहोत).

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. ०७/०२/२००३ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१९ मध्ये शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थेतील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत निवडश्रेणीच्या अनुषंगाने वेतननिश्चिती करणेबाबत नमूद केलेले आहे. सदर मुद्यात पदविका संस्थेतील अध्यापकांना असुधारीत वेतनश्रेणी रु. ३७००-१२५-४९००-१५०-५७००/- या वेतनश्रेणीत किंवा करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत दि. ०१/०१/१९९६ रोजी पासून निवडश्रेणी रु. १२०००-४२०-१८३००/- ही वेतनश्रेणीत मंजुर करण्यात आलेली आहे. अशा अध्यापकांना ५ वर्षाची सेवा पूर्ण केल्यावर दि. ०१/०१/२००१ रोजी रु. १२०००-४२०-१८३००/- या वेतनश्रेणीत किमान वेतन रु. १४९४०/- इतके वेतन उंचावून देणेबाबतची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन सदर वेतनश्रेणीसाठी संस्थेतील पात्र कार्यरत व सेवानिवृत्त अधिव्याख्याता यांना सुचित करण्यात येत आहे की, त्यांनी आपला अर्ज संबंधीत कागदपत्रासहित संस्थेच्या कार्यालयात तत्काळ जमा करावेत, जेणेकरुन सदर प्रस्ताव संहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचाकडे विहीत मुदतीत पाठविणे शक्य होईल. अर्जास विलंब झाल्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

SHRI BHAGUBHAI MAFATLAL POLYTECHNIC & COLLEGE OF ENGINEERING MUMBAI 400 056.

आचार्य
PRINCIPAL
SHRI BHAGUBHAI MAFATLAL POLYTECHNIC
AND COLLEGE OF ENGINEERING
VILE PARLE (WEST), MUMBAI- 400 056.